पत्राचे उत्तरात दिनांक 21.9.2006 ला वरील विषयाचे संदर्भात पतसंस्थेची भूमिका लेखी स्वरूपात कळविण्यांत आली होती व ती आजही कायम आहे याची कृपया नोंद घ्यावी असे उत्तर दिलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता/तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील व तक्रार दोन्ही दाखल केलेली दिसून येते.

3. अपीलकर्ता/तक्रारदार यांनी दिनांक 11.8.2006 रोजी एक साधा अर्ज संस्थेकडे केला त्यावर संस्थेनी दिनांक 18.8.2006 रोजी कळविले की, यापुढे होणा–या कार्यकारिणींच्या सभेसमोर आपले पत्र विचारार्थ ठेवले जाईल व त्यावर घेण्यात येणारा निर्णय पत्राद्वारे आपणास कळविल्या जाईल. त्यानंतर दिनांक 21.9.2006 रोजी पत्र जावक क्रमांक 1307/2006–07 अन्वये असे कळविण्यात आले की, संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिनांक 23 जुलै, 2006 रोजी झालेल्या कामकाजाचे ध्वनिमुद्रण केले आहे. आमसभेचे इतिवृत्त लिहितांना सभासदांनी मांडलेले मौलीक मुद्ये व विचार विस्मरणातून सुटू नये व ते जास्तीत जास्त अचूकपणे नोंदविले जावे यासाठी ध्वनीमुद्रण करण्यात आले. या आमसभेचे इतिवृत्त पुढील आमसभेत कायम केले जाते व या दृष्टिने ध्वनीमुद्रण फक्त इतिवृत्त लिहिण्याकरिता केले आहे. या ध्वनीफितीमध्ये आमसभेच्या कामकाजाचे ध्वनीमुद्रण केलेले असल्यामुळे त्या सार्वजनिक होवू नये यासाठी बाहेर देणे उचित नाही असे कार्यकारिणींचे मत आहे असे कळविले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे तक्रार करूनही न्याय मिळत नाही हे लक्षात आल्यानंतर दिनांक 12.10.2006 रोजी माहितीच्या अधिकाराचा वापर करून वर नमुद केल्याप्रमाणे रितसर अर्ज केला व वर नमुद केल्या प्रमाणे संस्थेने उत्तर दिलेले आहे. सदरच्या उत्तरामध्ये 1) विनंती अर्ज फेटाळण्याची कारणे, 2) असा विनंती अर्ज फेटाळण्या विरूध्द ज्या कालावधीत अपील करता येईल तो कालावधी, 3) अपील प्राधिकरणाचा तपशील. वरील कोणतीही माहिती मला कळविण्यांत

आली नाही व त्यामुळेच अपील व तक्रार दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपील/तक्रारीचे संदर्भामध्ये अध्यक्ष/सचिव यांचेकडून खुलासा मागविण्यात आलेला असून सुनावणीस उपस्थित राहण्याबद्यल नोटीस दिनांक 14.2.2008 रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु उत्तरवादी गैरतक्रारदार यांनी नोटरी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र सादर केलेले असून स्वतः किंवा प्रतिनिधी हे उपस्थित राहिलेले नाहीत.

4. अपीलकर्ता/तक्रारदार यांचे वकील श्री.आर.आर.पांडे यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सहकारी पतसंस्था हे सार्वजनिक प्राधिकरण आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 हा राज्य विधान मंडळाचा अधिनियम आहे. सहकारी पतसंस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या प्रमाणे पंजीबध्द केल्या शिवाय गठीत करता येत नाही. सदरच्या अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे सहकार आयुक्त यांचे सहकारी पतसंस्थेवर संपूर्ण नियंत्रण आहे. सहकारी पतसंस्था यांना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे निवडणूक घ्यावी लागते. सदरची निवडणूक ही सहकार आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असते. कोणत्याही प्रकारचा बदल हा संचालक मंडळात करावयाचा असेल तर त्याबाबत सहकार आयुक्तांना कळवावे लागते. संचालक मंडळ सदस्य निवडणूकीद्वारे असून संस्थेचे सभासद हे मतदार असतात व त्यामुळे ही खाजगी कंपनी नसून सहकार तत्वावर कामकाज करणारी संस्था आहे. संस्थेच्या सभासदांचे भाग भांडवल असते, जनतेच्या ठेवी असतात त्याचप्रमाणे पतसंस्था व्यवहारामध्ये प्रामुख्याने कर्ज वाटप केलेले असते व कर्जाच्या आलेल्या व्याजामधून ठेवीदारास व्याज दिले जाते, सभासदांना बोनस दिला जातो याचा अर्थ संपूर्ण आर्थिक व्यवहार हा सार्वजनिक स्वरूपाचा आहे. त्याकरिता संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे लेखा परिक्षण हे सहकार विभागातर्फे करण्यात येते. कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहाराची तक्रार असल्यास सहकार विभागाकडून चौकशी करता येते. प्रशासक नियुक्त करता येतो यावरून संस्थेचे संपूर्ण

कामकाजावर शासनाचे नियंत्रण आहे असे दिसून येते व शासनाचे नियंत्रण हे सार्वजनिक संस्था असल्यामुळेच आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. सभासद व ठेवीदार यांचे प्रामुख्याने हितसंबंध सुरक्षित ठेवणे यामुळेच शासनाचे नियंत्रण असते. यामुळेच शासनाचे वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष नसलेले सकृतदर्शनी सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत जरी पतसंस्था येत नसली असे असले तरी सुध्दा सदरच्या व्याख्येतून राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाप्रमाणे व शासनाचे नियंत्रण या दोन्ही निकषाप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही असा युक्तिवाद केला. तसेच पतसंस्थेनी दिलेल्या उत्तरामध्ये मात्र माहितीचा अधिकार अधिनियम त्यांना लागू नाही अशा प्रकारचे उत्तर त्यांनी दिलेले नाही. मात्र दाखल केलेल्या लेखी खुलाश्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम–2005 हा लागू नाही व त्याकरिता मुख्य माहिती आयुक्त, मुंबई, राज्य माहिती आयोग, मुंबई यांनी अपील क्रमांक 2006/225/02 श्री.राजेंद्र लक्ष्मण म्हेत्रे विरूध्द अपीलीय अधिकारी हा निर्णय दाखल केलेला आहे व तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक 8.2.2006 च्या परिपत्रकामध्ये नागरी सहकारी बॅकांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरितीने देण्यांत येत नसल्याने व तसेच त्यांनी इतर वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या अर्थसहाय्यास शासकीय हमीच्या स्वरूपात सहाय्य करण्यांत येत नसल्यामुळे त्यांना उपरोक्त अधिनियमातील तरतुदी लागू नसल्याबाबतचे स्पष्टीकरण या आदेशान्वये करण्यांत आलेले आहे. त्याबाबतचे सुध्दा दाखला दिलेला दिसून येतो. त्याबाबत अपीलकर्ता यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, कोणत्याही अधिनियमाचा अर्थ हा शासकीय अधिका–यांना परिपत्रकाचे माध्यमातून देता येत नसल्यामुळे सदरचे स्पष्टीकरण करण्याचा अंतिम अधिकार हा सहकार आयुक्तांचा नाही व त्यामुळे सहकार आयुक्त यांचे परिपत्रक हे सहकारी संस्था यांना लागू होणार नाही.

5. वरील युक्तीवादामध्ये अपीलकर्ता/तक्रारदार यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता सहकारी पतसंस्था माहितीचा अधिकार अधिनियम–2005 हा लागू करावयास पाहिजे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी अधिनियमाचे तरतुदीचा अन्वयार्थ लावून परिपत्रक निर्गमित करण्यास कोणतेही अधिकार नाही. तसेच सहकारी संस्था ही सहकार तत्वावर असल्यामुळे व कोणत्याही एका व्यक्तींची खाजगी कंपनी नसल्यामुळे व सार्वजनिक निधीच्या संदर्भात आर्थिक व्यवहार होत असल्यामुळे सदरच्या अधिनियमाच्या तरतुदी लागू करून माहिती उपलब्ध करून देण्याचे संदर्भात कोणत्याही प्रकारचे गोपनीयतेचे कारण देता येत नाही. तसेच उत्तरवादी गैरतक्रारदार यांच्या लेखी खुलाश्यामध्ये असे दिसून येते की, अपीलकर्ता/तक्रारदार हे संस्थेचे सभासद असल्यामुळे त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम–1960 च्या कलम 32 व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 च्या नियम 27 प्रमाणे कोणत्याही प्रकारचे अभिलेखांच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना अधिकार आहे व त्या माध्यमातून ते उपलब्ध करून घेवू शकतात व अशा प्रकारे जर तरतुद राज्य विधानमंडळाचे अधिनियमात आहे तर सदरची तरतुद ही माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या तरतुदीस पुरक आहे व त्यामुळेही सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांची वैयक्तिक माहिती शिवाय माहिती उपलब्ध करून देण्याच्या कोणत्याही प्रकारचा प्रत्याव्यय असू नये व त्याकरिता उत्तरवादी गैरतक्रारदार संस्थेनी संस्थेमध्ये जनमाहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे संयुक्तिक राहील.

6. अपीलकर्ता/तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची ध्वनीफित मागितलेली दिसून येते. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे हे महाराष्ट्राच्या अधिनियमाप्रमाणे अनिवार्य आहे व त्याबाबतचा वार्षिक अहवाल हा प्रसिध्द करावा लागतो व तसे न केल्यास सहकार

विभागास सहकारी संस्थांच्या विरूध्द अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे कार्यवाही सुध्दा करता येते व वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सभासदांना उपस्थित राहण्याचा हक्क असल्यामुळे कोणत्याही प्रकारची गोपनीयतेचा प्रश्न उपस्थित करता येणार नाही. अधिनियमाचे कलम 2 मध्ये ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधार सामुग्री तसेच डिस्केट्स, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरूपातील माहिती मिळविणे याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना ध्वनीमुद्रीत फीतीच्या स्वरूपात सर्वसाधारण वार्षिक सभेचे इतिवृत्ताची मागणी केली असल्यास ती त्यांना उपलब्ध करून देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता/तक्रारदार यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) नुतन विदर्भ शिक्षण मंडळ पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अमरावती सहकार सुरभी सभागृह विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम–2005 हा लागू करण्यात येत असून अधिनियमाचे कलम 5 प्रमाणे संस्थेस हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी नियुक्त करावा.

2) जनमाहिती अधिकारी नियुक्त केल्यानंतर 5 दिवसांचे आंत अपीलकर्ता/तक्रारदार यांनी दिनांक 23 जुलै 2006 रोजीच्या पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ध्वनीफितीचा खर्च कळविण्यात येवून खर्च भरल्यानंतर सदरची ध्वनीफित उपलब्ध करून देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर.

दिनांक 4.3.2008

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.